## थोडक्यात पण महत्वाचे




### प्रवरा माध्यमिक विद्यालयात डॉ. विखे पाटील यांची जयंती उत्साहात साजरी

पाथर्डी (स. गांवकरी) : तालुक्यातील भूते टाकळी येथील प्रवरा माध्यमिक विद्यालय येथे लोकनेते, पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील यांची 94 वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. याप्रसंगी शाळा समितीचे अध्यक्ष कुमार भाऊ फुंदे, सदस्य भाऊसाहेब फुंदे, जि. प. मराठी शाळेचे मुख्याध्यापक रमेशराव कराड, सहशिक्षक नवनाथ राव चौधर, पालक बाबासाहेब फुंदे, विद्यार्थिनी यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन झाले. सहशिक्षक गोडगे बंडोपंत यांनी साहेबांच्या जीवन परिचयावर प्रकाश टाकला. सूत्रसंचालन टाकळकर आजिनाथ यांनी तर आभार फुंदे बाळासाहेब यांनी मानले. याप्रसंगी विद्यालयाचे मुख्याध्यापक पठाण आसिफ, सहशिक्षक भगत अशोक, सांबारे धनंजय, खेडकर अशोक, फुंदे वाल्मीक, फुंदे रामकिसन उपस्थित होते. उपस्थित विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करण्यात आला.

### भालेश्वर हायस्कूल भालगावचे 10 वी परीक्षेत दैदिप्यमान यश


पाथर्डी (स. गांवकरी) : महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ यांच्या मार्फत घेण्यात आलेल्या फेब्रु./मार्च - 2026 एस.एस. सी.परीक्षेचा निकाल दि.08/05/2026 रोजी घोषित करण्यात आला. या परीक्षेत तालुक्यातील भालगाव येथील भालेश्वर हायस्कूल भालगावचे एकूण 64 विद्यार्थी प्रविष्ट झाले होते.त्यापैकी 63 विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. प्रथम तीन विदयार्थी पुढील प्रमाणे आहेत :1) कु. कासुळे कांचन गोविंद -90.20 %2) चि. वनारसे समर्थ सुनील -89.20 %2) चि. खेडकर ओंकार आजीनाथ - 89.20%3) कु. सोनवणे प्रिया भागवत-88.80% सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे व त्यांना मार्गदर्शन करणा-या सर्व शिक्षकांचे कर्मयोगी आबासाहेब काकडे शैक्षणिक समूहाचे अध्यक्ष ॲड.डॉ.श्री विद्याधर काकडे, जिल्हा परिषद सदस्या सौ.हर्षदाताई काकडे, विश्वस्त श्री.पृथ्वीसिंग भैय्यासाहेब काकडे,कर्मयोगी आबासाहेब काकडे शैक्षणिक समूहाचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रा.डॉ.श्री लक्ष्मणराव बिटाळ, शैक्षणिक विभाग प्रमुख श्रीम. वंदना पुजारी, शैक्षणिक विभाग सहप्रमुख श्री अशोक आहेर,भालेश्वर हायस्कूल भालगावचे मुख्या. श्री हनुमान गोर्डे ,समन्वयक श्री दिगंबर नजन, वर्गशिक्षक श्री भाऊसाहेब शिंदे,सर्व शिक्षक वृंद व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन करून पुढील शैक्षणिक वाटचालीस व उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

### विहिरीत मायलेकाचे मृतदेह आढळले; हत्या की आत्महत्या?



जामखेड (स. गांवकरी) : जामखेड तालुक्यातील तरडगाव शिवारात एक धक्कादायक घटना उघडकीस आली आहे.दत्तोबा ढाळे यांच्या विहिरीमध्ये मायलेकाचे मृतदेह आढळल्याने संपूर्ण तालुक्यात खळबळ उडाली आहे. शाळू शिवाजी चौरे (वय २२) आणि तिचा दीड वर्षाचा मुलगा विवांश शिवाजी चौरे अशी मृतांची नावे असून, या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. मिळालेल्या माहितीनुसार, वंजारवाडी येथील बिभीषण तांदळे (वय ५९) यांनी खर्डा पोलीस स्टेशनला दिलेल्या माहितीनुसार, त्यांची पत्नी आणि नातू हे १० मे पासून बेपत्ता होते.शोध सुरू असतानाच, आज (११ मे) सकाळी ११ वाजेच्या सुमारास तरडगाव येथील दत्तोबा ढाळे यांच्या विहिरीत दोघांचेही मृतदेह तरंगताना आढळून आले.घटनेची माहिती मिळताच खर्डा पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक उज्ज्वलसिंह राजपूत व सहाय्यक फौजदार सय्यद यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. मृतदेह विहिरीबाहेर काढून जामखेड येथील ग्रामीण रुग्णालयात नेण्यात आले, तिथे डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले.पोलीस तपास आणि संशयाचे गुड अद्यापही समजले नाही. ही घटना नेमकी कशी घडली, याबाबत अद्याप स्पष्टता मिळालेली नाही.प्राथमिक अंदाजानुसार,मृत्यूची वेळ १० मे च्या मध्यरात्री १ ते ३ वाजेच्या दरम्यान असावी,असे नमूद करण्यात आले आहे.याप्रकरणी खर्डा पोलीस स्टेशनमध्ये भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम १९४ अंतर्गत अकस्मात मृत्यूची नोंद (क्र. १२/२०२६) करण्यात आली आहे. ही घटना निव्वळ आत्महत्या आहे की यामागे काही घातपात झाला आहे?मायलेक वंजारवाडीतून तरडगाव येथील विहिरीपर्यंत कसे पोहोचले?या प्रकरणी तालुक्यातील नागरिकांमध्ये विविध चर्चांना उधाण आले आहे.सध्या या प्रकरणाचा तपास सहाय्यक फौजदार सय्यद करत असून, खर्डा पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक उज्ज्वलसिंह राजपूत यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील कायदेशीर प्रक्रिया आणि चौकशी सुरू आहे. पोस्टमार्टमच्या अहवालानंतर मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट होईल,अशी माहिती पोलिसांनी दिली आहे.

### लक्ष्मीताई पवार यांना “महाराष्ट्र गुणगौरव पुरस्कार २०२६” घोषीत



जामखेड (स. गांवकरी) : समाजकार्य, महिला सक्षमीकरण तसेच विविध सामाजिक उपक्रमांमध्ये उल्लेखनीय योगदान देणाऱ्या लक्ष्मीताई पवार यांची “बी द चेंज फाउंडेशन” आयोजित “महाराष्ट्र गुणगौरव पुरस्कार २०२६” साठी निवड करण्यात आली आहे. हा भव्य पुरस्कार सोहळा रविवार, १७ मे २०२६ रोजी शिर्डी येथे आयोजित करण्यात आला आहे. समाजासाठी निःस्वार्थ भावनेतून केलेले कार्य, सामाजिक क्षेत्रात निर्माण केलेली सकारात्मक प्रेरणा तसेच विविध स्तरांवर केलेल्या उल्लेखनीय योगदानाची दखल घेत फाउंडेशनतर्फे त्यांचा सन्मान करण्यात येणार आहे. लक्ष्मीताई पवार यांनी तळागाळातील शोषित पीडित वंचित घटकातील विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणलेले आहे तसेच आदिवासी भटक्या समाजाच्या विविध शासकीय योजनांचा या घटकांना लाभ मिळवुन देण्यासाठी मंत्रालय स्तरावर पाठपुरवा करून त्यांना मदत मिळवुन दिली आहे तसेच माणुस हा जन्माने नव्हे तर कर्माने सिध्द होत आसतो या भावनेतून त्यांनी कार्य केले आसुन आपल्या परिवारातील सदस्यांना उच्च शिक्षित करून समाजात प्रतिष्ठा मिळवून दिली आहे याचीच प्रचिती म्हणजे लक्ष्मीताई यांनी मुलगा हर्षद काळे यांना सभापती प्रा राम शिंदे यांच्या अशिर्वादाने जामखेडच्या नगरपरिषदेत नगरसेवक म्हणून जनतेची सेवा करण्यासाठी पाठवले आहे त्यांच्या या कार्यामुळे अनेकांना प्रेरणा मिळत असून सामाजिक परिवर्तनासाठी त्यांनी सातत्याने केलेले प्रयत्न कौतुकास्पद मानले जात आहेत. “बी द चेंज फाउंडेशन” तर्फे आयोजित या पुरस्कार सोहळ्यात राज्यभरातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांचा गौरव करण्यात येणार आहे.

# “हा हल्ला संतांच्या सहिष्णू महाराष्ट्राच्या परंपरेवर”

## शाईफेक प्रकरणावर काँग्रेस आक्रमक

पुणे : (स. गांवकरी)

इंडियन नॅशनल काँग्रेसने राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रवक्ते आणि प्रवचनकार विकास लवांडे यांच्यावर झालेल्या शाईफेक हल्ल्याचा तीव्र निषेध केला आहे. हा हल्ला केवळ विकास लवांडे यांच्यावर नसून, महाराष्ट्राच्या संतपरंपरा, सहिष्णुता आणि सामाजिक सलोखा यांच्या मूल्यांवरच आघात असल्याचे काँग्रेसचे वरिष्ठ प्रवक्ते गोपाळ तिवारी यांनी म्हटले आहे.

प्रसिद्धीपत्रकाद्वारे प्रतिक्रिया देताना गोपाळ तिवारी म्हणाले की, स्वतःला वारकरी म्हणवणारे संग्राम भंडारे यांनी केलेला हा प्रकार अत्यंत निंदनीय असून महाराष्ट्राच्या संतसंस्कृतीला काळिमा फासणारा आहे. संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज आणि जगद्गुरू तुकाराम महाराज यांनी समाजाला सहिष्णुता, समता आणि मानवतेचा संदेश दिला. त्या संतपरंपरेचा वारसा असलेल्या महाराष्ट्रात अशा प्रकारची हिंसक प्रवृत्ती वाढत असल्याची खंत त्यांनी व्यक्त केली.

तिवारी यांनी आरोप केला की, संग्राम भंडारे यांनी यापूर्वीही काँग्रेसचे ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांच्याविरोधात धमकीची भाषा वापरली होती. त्यावेळी राज्यभरातून निषेध व्यक्त करण्यात आला होता. तरीही अशा प्रवृत्तींना आळा बसलेला नाही. काही कट्टरवादी विचारसरणींना राजकीय पाठबळ मिळत असल्यामुळेच अशा घटना वारंवार घडत असल्याचा



आरोप त्यांनी केला. त्यांनी पुढे सांगितले की, महाराष्ट्राची ओळख ही संत, समाजसुधारक आणि पुरोगामी विचारांनी घडलेली आहे. छत्रपती शिवाजी महाराज, राजर्षी शाहू महाराज, महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, आगरकर, महर्षी कर्वे, कर्मवीर भाऊराव पाटील यांसारख्या महान व्यक्तींनी महाराष्ट्रात समता, शिक्षण आणि सामाजिक न्यायाची पायाभरणी केली. त्यांच्या विचारांमुळे महाराष्ट्राने देशाला प्रगत आणि पुरोगामी दिशा दिली. मात्र आज काही प्रतिगामी शक्ती महाराष्ट्राच्या या पुरोगामी ओळखीला धक्का पोहोचवण्याचा प्रयत्न करत असल्याचा आरोप काँग्रेसने केला.

वारकरी संप्रदाय हा प्रेम, भक्ती, सहिष्णुता आणि मानवतेचा संदेश देणारा असून समाजात ऐक्य निर्माण करणारा आहे. परंतु शाईफेकसारख्या घटनांमुळे या परंपरेत हिंसक आणि कट्टरवादी प्रवृत्तींचा शिरकाव झाल्याचे दिसून येत असल्याची चिंता गोपाळ तिवारी यांनी व्यक्त केली. वारकरी संप्रदायाला अशा प्रवृत्तींपासून मुक्त करणे ही काळाची गरज असल्याचेही त्यांनी नमूद केले.

काँग्रेसने राज्य सरकारवरही अप्रत्यक्ष टीका करताना म्हटले की, महाराष्ट्रातील सामाजिक सलोखा आणि सहिष्णुतेचे वातावरण बिघडवण्याचा प्रयत्न सुरू आहे. संतांच्या विचारांवर चालणाऱ्या महाराष्ट्रात अशा प्रकारच्या घटना घडणे हे राज्याच्या प्रतिमेला धक्का देणारे आहे. दरम्यान, या शाईफेक प्रकरणानंतर राजकीय वर्तुळात मोठी चर्चा सुरू झाली असून विविध स्तरांतून या घटनेचा निषेध व्यक्त केला जात आहे. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक आणि संतपरंपरेचा आदर राखत समाजात शांतता व संवादाचे वातावरण टिकवणे आवश्यक असल्याचे मत अनेकांनी व्यक्त केले आहे.

## विद्यार्थ्यांचा ओम शांती कॉम्प्युटर क्लासेसकडून गौरव

- पडघा परिसरातील गुणवंत विद्यार्थी व पालकांचा होणार सन्मान
- विद्यार्थ्यांनी संपर्क साधण्याचे आवाहन

भिवंडी : (स. गांवकरी)

महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षण मंडळाचा दहावीचा निकाल नुकताच जाहीर झाला असून, या परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांचा ओम शांती कॉम्प्युटर क्लासेस, पडघा यांच्या वतीने विशेष सन्मान करण्यात येणार आहे. पडघा परिसरातील विविध शाळांमध्ये प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांक मिळवणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांसह त्यांच्या पालकांचाही गौरव करण्यात येणार असल्याने विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. या सन्मान सोहळ्यात आदर्श विद्यालय, कुरुंद, शारदा विद्यालय पडघा, डी. के. सूर्यराव विद्यालय तळवली, डी. डी. पाटील विद्यालय लाप, बी. बी. पाटील विद्यालय कुरुंद, बी. ए. राऊत विद्यालय पाच्छापूर, टी. ए. पाटील इंग्रजी शाळा पडघा, आर. के. पालवी इंग्रजी शाळा पडघा, के. एम. ई. एस., एम. के. सी., प्रोग्रेसिव्ह न्यू इंग्लिश मीडियम स्कूल भोईरपाडा, एस. एम. वाय. रईस हायस्कूल तळवली तसेच परिसरातील इतर शाळांमधील गुणवंत विद्यार्थ्यांचाही समावेश करण्यात येणार आहे. दहावीत उत्कृष्ट यश संपादन केलेल्या सर्व विद्यार्थ्यांनी ओम शांती कॉम्प्युटर क्लासेस येथे संपर्क साधून आपल्या सहभागाची नोंद करावी, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. समाजाचे आपण काहीतरी देणे लागतो. विद्यार्थ्यांना प्रोत्साहन मिळावे, शैक्षणिक चळवळ अधिक गतिमान व्हावी आणि गुणवंत विद्यार्थ्यांच्या यशाचा गौरव व्हावा या उद्देशाने हा सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला आहे.

## छत्रपती संभाजी महाराज जन्मोत्सव सोहळा होणार साजरा

सिन्नर पांगरी : (स. गांवकरी)

धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांची 369 वी जयंती गुरुवारी 14 में 2026 रोजी साजरी होत आहे. छावा भारत क्रांती मिशनचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ विलास पांगारकर याच्या नेतृत्वाखाली यावर्षी हा जन्मोत्सव सोहळा आग्रा उत्तर प्रदेश येथे साजरा करण्यात येणार आहे .सोमवारी (दि ११) सिन्नर तालुक्यातील पांगरी येथून धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज याचा 13 फूट अश्वारूढ पुतळ्या सह सायंकाळी ५ वाजता आग्रा च्या दिशेने मार्गस्थ झाली.

ही रथ यात्रा पांगरी वावी कोपरगाव येवला मनमाड मालेगाव धुळे शिरपूर मधप्रदेश, राजस्थान राज्याची राजधानी येथे राजभवन येथे राज्यपाल हरीभाऊ बागडे नाना हे १३ में रोजी रथयात्रेचे स्वागत करतील. यानंतर ही रथ रात्री आग्रा येथे पोहचेल .गुरुवारी 14 में रोजी आग्रा येथील लाल किल्ल्यासमोरील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्मारक येथे पूजन होईल. यानंतर



**नाशिक ते आग्रा राष्ट्रीय गौरव यात्रा रवाना**

येथील प्राचीन हनुमान मंदिर येथे जयंती समारोहाचा कार्यक्रम होईल.

या कार्यक्रमासाठी केंद्रीय राज्यमंत्री एस पी सिंह बघेलजी, उत्तर प्रदेशचे कॅबिनेट मंत्री योगेंद्र उपाध्यायजी, केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव, केंद्रीय सामाजिक न्याय मंत्री रामदासजी आठवले, सुदर्शन न्युज चे संचालक सुरेशजी चव्हाणके, जिजाऊ चे माहेर कडील वंशज शिवाजीराजे जाधव, आग्रा भाजपचे महानगर प्रमुख राजकुमार गुप्ता , आग्रा भाजप जिल्हाध्यक्ष प्रशांत पौनिया, आग्रा नगर निगम नगरसेवक सुनील कर्मचंदानी आदि मान्यवर उपस्थित होते.

राष्ट्रीय अध्यक्ष डॉ विलासभाऊ पांगारकर, मुख्य समन्वयक विजय काकडे पाटील, संघटक परमेश्वर नलावडे पाटील, रामनारायण मराठा, शशिकांत पवार, अमोल सोनवणे, निवृत्ती मुरडणर, अतुल पांगरकर आदी सह शिव शंभू भक्त शेकडो वाहनां सह उपस्थित होते. छावा भारत क्रांती मिशनच्या १९९६ साली छत्रपती संभाजीनगर येथे पहिली छत्रपती संभाजी महाराज जयंती साजरी करण्यात आली. तेव्हापासून, संपूर्ण महाराष्ट्रात ही जयंती मोठ्या उत्साहात साजरी केली जात आहे.

महाराष्ट्र सरकारने २०२३ मध्ये महाराष्ट्र राज्य स्तरावर छत्रपती संभाजी महाराज जयंती साजरी करण्यास मान्यता दिली आहे. छत्रपती संभाजी महाराजांचे शौर्य आणि प्रशासकीय कौशल्ये, तसेच अनेक भाषांवरील त्यांचे प्रभुत्व, असंख्य ग्रंथांचे लेखन, शिक्षणावरील त्यांचे प्रेम आणि साक्षर समाज घडवण्यासाठी केलेले त्यांचे यशस्वी प्रयत्न, ही त्यांची मार्गदर्शक तत्त्वे आहेत.

हा संदेश राष्ट्रीय स्तरावर प्रसारित करण्याची गरज असल्यामुळे हा जन्मोत्सव राष्ट्रीय स्तरावर साजरा करण्यात येत आहे. मागील वर्षी देशाची राजधानी दिल्ली येथे हा सोहळा साजरा करण्यात आला होता.

## राष्ट्रीय लोकअदालतीत ४.९१ कोटींची वसुली

श्रीगोंदा : (स. गांवकरी)

जिल्हा न्यायालय, श्रीगोंदा येथे ९ मे रोजी आयोजित करण्यात आलेल्या राष्ट्रीय लोकअदालतीत विविध प्रकारची एकूण ४००४ प्रकरणे तडजोडीने निकाली काढण्यात आली. या माध्यमातून तब्बल ४ कोटी ९१ लाख २४ हजार ९२ रुपयांची वसुली करण्यात आली.

यावेळी जिल्हा न्यायाधीश एस. एच. साळुंखे यांनी पक्षकारांनी अधिकाधिक प्रकरणे लोकअदालतीत निकाली काढून वेळ व पैसा वाचवावा, असे आवाहन केले. पूर्वी गावांमध्ये पंचांसमक्ष वाद मिटवले जात असत, त्याच धर्तीवर लोकअदालतीत तडजोडीने वाद मिटवले जातात. लोकअदालतीमुळे पक्षकारांना जलद न्याय मिळण्यासोबतच परस्परांतील सलोखाही कायम राहतो, असे त्यांनी सांगितले. श्रीगोंदा वकील संघाचे अध्यक्ष ॲड. जे. बी. शिंदे यांनी लोकअदालतीचे महत्त्व व फायदे स्पष्ट करत नागरिकांनी अधिकाधिक



**४००४ प्रकरणे निकाली**

प्रकरणे तडजोडीने निकाली काढण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन केले.

कार्यक्रमास तदर्थ जिल्हा न्यायाधीश-१ एम. एम. राव, सहदिवाणी न्यायाधीश ए. एन. कुलकर्णी, एच. जे. पठाण, आर. बी. खवले, श्रीगोंदा-कर्जत-जामखेड बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. एस. वाय. पत्की यांच्यासह विविध वकील, पंचायत समिती, ग्रामपंचायत, बँका, नगरपरिषद, महावितरण विभागाचे अधिकारी-कर्मचारी, न्यायालयीन कर्मचारी, पोलीस कर्मचारी व पक्षकार उपस्थित होते. लोकअदालतीमध्ये मोटार अपघात, भूसंपादन, कौटुंबिक वाद, दिवाणी व फौजदारी प्रकरणांसह ग्रामपंचायत, नगरपालिका, बँका आणि महावितरण विभागाची खटलापूर्व प्रकरणे ठेवण्यात आली होती. यामध्ये दाखल ४५ प्रकरणांमधून १ कोटी ५३ लाख ८२ हजार ८१० रुपयांची, तर दाखलपूर्व ३९५९ प्रकरणांमधून ३ कोटी ३७ लाख ४१ हजार २८२ रुपयांची वसुली करण्यात आली.

## शनी जयंती निमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन

राहुरी : (स. गांवकरी)

राहुरी शहरातील एकाच ठिकाणी असलेले श्री राहु, केतू, शनैश्वर व मारूती मंदिरात शनैश्वर जयंती निमित्त शनिवार, दि.१६ मे २०२६ रोजी अभिषेक, महाआरती व फराळ वाटपाचे आयोजन करण्यात आले असून सर्व शनीभक्तांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन शनैश्वर सेवाभावी मित्र मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे. वैशाख महिन्यातील अमावस्येच्या दिवशी शनी देवाची जयंती साजरी केली जाते. यंदाची शनैश्वर जयंती ही शनिवारीच आली असल्याने एक दुर्मिळ योग मानला जात आहे. हा योग सुमारे १३ वर्षांनी आला आहे. या दुर्मिळ योगाचे अध्यात्मिकदृष्ट्या मोठे शक्तीशाली महत्व असून शनीभक्तांसाठी मोठी पर्वणी ठरणार आहे. या दिवशी पूजा, व्रत आणि दान केल्याने शनी साडेसाती, ढैय्या, कुंडलीतील शनी दोषांपासून मुक्ती मिळते. या दिवशी अनेक शुभ योग




जुळून येतात. काळे तीळ, काळे उडीद दाळ, काळे कपडे, काळी छत्री किंवा लोखंडी वस्तूंचे दान करणे शुभ मानले जाते. राहुरी येथील एकाच ठिकाणी असलेले श्री राहु, केतू, शनैश्वर व मारूती मंदिरात शनैश्वर जयंती निमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आलेले आहे. नऊ ग्रहांपैकी तीन ग्रह राहु, केतू आणि शनी यांचे एकाच ठिकाणी असलेले हे एकमेव मंदिर आहे. राहूचे धड येथे पडले म्हणून राहुरी असे नाव आहे. अहिल्यानगर जिल्ह्यापासून ३५ किमी तर शनी शिंगणापूर ३० किमी व शिर्डीपासून ४५ किमी अंतरावर मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या राहुरी या शहरात एकाच ठिकाणी राहु, केतू व शनी मंदिर आहे.

## हृदयसम्राट निरंकारी बाबा हरदेव सिंह यांना अर्पित ‘समर्पण दिवस’

पुणे : (स. गांवकरी)

मानवतेच्या कल्याणासाठी एखाद्या महान आत्म्याचे संपूर्ण जीवन समर्पित झाले की, त्या व्यक्तिमत्त्वाच्या स्मृती या केवळ इतिहासापुरत्या मर्यादित राहत नाहीत, तर त्या युगानुयुगे जनमानसाला प्रेरणा देणारा दिव्य स्रोत ठरतात. मानवता, प्रेम, विनम्रता आणि आध्यात्मिक जागृतीचे अद्वितीय प्रतीक असलेल्या युगद्रष्टा निरंकारी बाबा हरदेव सिंह जी महाराज यांच्या पावन स्मृतीस समर्पित ‘समर्पण दिवस’ भावपूर्ण वातावरणात बुधवार, १३ मे २०२६ रोजी संत निरंकारी आध्यात्मिक स्थळ, समालखा (हरियाणा) येथे आयोजित करण्यात येणार आहे. हा कार्यक्रम सायंकाळी ५ ते रात्री ९ वाजेपर्यंत सतगुरु माता सुदीक्षाजी महाराज तथा श्रद्धेय



निरंकारी राजपिताजी यांच्या पावन सान्निध्यात संपन्न होईल. त्यानंतर उपस्थित श्रद्धाळूंना सतगुरु माताजींचे आशीर्वचन श्रवण करण्याची संधी लाभणार आहे. देश-विदेशातून मोठ्या संख्येने उपस्थित राहणारे श्रद्धाळू, भक्तगण आणि मानवताप्रेमी या प्रसंगी श्रद्धा, भक्ती आणि समर्पणाची भावांजली अर्पण करतील. या कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण निरंकारी मिशनच्या अधिकृत संकेतस्थळावर करण्यात येणार असून, जगभरातील श्रद्धाळूंना त्याचा लाभ घेता येणार आहे.

निरंकारी बाबा हरदेव सिंहजी हे केवळ संत निरंकारी मिशनचे आध्यात्मिक गुरु नव्हते, तर ते प्रेम, करुणा, सहजता आणि मानवी संवेदनांचे सजीव प्रतीक होते. त्यांच्या मधुर हास्याने, विनम्र व्यक्तिमत्त्वाने आणि दिव्य वाणीतून असंख्य लोकांना आत्मिक शांततेचा अनुभव दिला. आत्मज्ञानाच्या प्रकाशातून त्यांनी समग्र मानवजातीला असा संदेश दिला की, प्रेम, सेवा, सहअस्तित्व आणि समर्पण यांवर आधारलेले जीवनच खऱ्या अर्थाने सार्थक ठरते.

त्यांच्या दिव्य नेतृत्वाखाली संत निरंकारी मिशनने समाजसेवेला अध्यात्माशी जोडत रक्तदान शिबिरे, स्वच्छता अभियान, वृक्षारोपण, आरोग्यसेवा, शिक्षण, महिला सक्षमीकरण तसेच युवकांच्या ऊर्जेला आध्यात्मिक दिशा देणारे विविध लोककल्याणकारी उपक्रम राबविले. समाजात सकारात्मक परिवर्तनाची सशक्त चळवळ निर्माण करण्यात मिशनने मोलाची भूमिका बजावली. ईश्वरभक्ती ही मानवसेवेतूनच खऱ्या अर्थाने सिद्ध होते, हा बाबाजींचा स्पष्ट दृष्टिकोन होता.

सुमारे ३६ वर्षे मिशनचे नेतृत्व करताना बाबा हरदेव सिंहजी यांनी संत निरंकारी मिशनला जागतिक स्तरावर नवी ओळख आणि उंची प्राप्त करून दिली. आज हे मिशन ६७ हून अधिक देशांमध्ये आध्यात्मिक जागृती, नैतिक मूल्ये आणि मानवकल्याणाचा संदेश प्रभावीपणे पोचवत आहे. त्यांच्या तप, त्याग आणि दूरदृष्टीमुळे मिशनला आंतरराष्ट्रीय स्तरावर विशेष सन्मान प्राप्त झाला असून संयुक्त राष्ट्रांच्या सामाजिक व आर्थिक परिषदेचे सल्लागार म्हणूनही प्रतिष्ठा प्राप्त झाली आहे.

“एकत्वातून सद्भाव”, “वसुधैव कुटुंबकम्” आणि “एकाला जाणा, एकाला माना आणि एक व्हा” या दिव्य संदेशांद्वारे बाबाजींनी संपूर्ण मानवजातीला प्रेम आणि ऐक्याच्या सूत्रात बांधण्याचा प्रयत्न केला. ‘भिंतीविरहित विश्व’ ही त्यांची संकल्पना आजही विश्वबंधुत्व, समानता आणि वैश्विक प्रेमाची प्रेरणा देत प्रत्येक हृदयास प्रकाशित करीत आहे. वर्तमानात सतगुरु माता सुदीक्षाजी महाराज त्याच दिव्य परंपरेची धुरा समर्थपणे पुढे नेत असून प्रेम, सेवा, संयम आणि आध्यात्मिक चेतनेचा संदेश जनसामान्यांपर्यंत पोहोचवत आहेत. त्यांच्या करुणामय सान्निध्यात संत निरंकारी मिशन मानवतेला आत्मबोध, नैतिकता आणि विश्वबंधुत्वाच्या मार्गावर सातत्याने प्रेरित करीत आहे.

‘समर्पण दिवस’ हा केवळ श्रद्धांजली अर्पण करण्याचा दिवस नसून, मानवतेला प्रेम, सेवा, विनम्रता आणि समर्पणाच्या मार्गावर चालण्याची प्रेरणा देणाऱ्या त्या दिव्य जीवनदर्शनाला आत्मसात करण्याचा एक पावन पर्व आहे. हा दिवस प्रत्येकाच्या अंतःकरणात ही जाणीव जागृत करतो की, महान आत्मा आपल्या कर्मातून, विचारांतून आणि आदर्शांतून सदैव जिवंत राहतात तसेच युगानुयुगे मानवतेचा मार्ग प्रकाशमान करीत राहतात.